नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/06/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपीला आजिवन कारावासाची शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक १७/०९/२०१९ चे २३.४६ वा. सुमारास यातील **आरोपी नामे— विजय कवडुजी जाधव, वय ३३ वर्ष, रा. गोंडखैरी ता. कळमेश्वर जि. नागपूर** याने आपल्या पत्नीचे मृतक नामे— आकाश गुलाब टोंगे, वय २० वर्ष रा. गोंडखैरी ता. कळमेश्वर जि. नागपूर याचे सोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून मृतकास आपल्या घरी बोलावुन त्यास नायलॉनच्या दोरीने गळा आवळुन त्याचे डोके फरशीवर आपटुन त्याच्या तलवारीने मारुन जिवीनाशी ठार केले. सदर घटनेच्या अनुशंगाने फिर्यादी नामे— दशरथ शंकरराव टोंगे, वय ४३ वर्ष रा. गोंडखैरी ता. कळमेश्वर जि. नागपूर यांनीयेथे दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ६५५/२०१९ कलम ३०२ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर प्रकरणाचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार यांनी तपास पुर्ण करून आरोपीविरूद्ध दोषारोपपत्र तयार करून मा. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर येथे सादर केले होते. आज दिनांक १५/०६/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. ०८ श्री. आर. एस. पावसकर सो. यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादवि मध्ये आजिवन कारावास व १०,०००/— रु. दंड व दंड न भरल्यास ०३ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारच्या वतीने एपीपी लिना गजभिये मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ/८९ प्रमोद कडबे पो.स्टे कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

## अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग/आरोपी अटकेत

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक १७/०१/२०२२ चे १४/०० वा. ते दिनांक १४/०६/२०२३ चे आज पावेतो फिर्यादी हिचे सोबत ओळख निर्माण करून त्यानंतर तिला लग्नाचे आमीष दाखवुन आरोपी नामे— आशिष सदाशिव राजुके, वय २४ वर्ष, रा. सौंसर निमनी मध्यप्रदेश ह. मु. वलनी खापरखेडा याने पिडीता हिच्या सोबत शारिरीक संबंध प्रस्थापित करून ती आरोपी पासुन ५ महीन्याची गर्भवती आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (र) ३७६ (२) (छ) भादवि सह ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम, मो. नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. काटोल** :– फिर्यादी नामे– सौ. भारती पिटुजी लाड, वय ३३ वर्ष, रा. येरला धोटे ता. काटोल ह. मु. सावरगांव हिचा पती आरोपी नामे– पिन्टु मारोतराव लाड, वय ६० वर्ष, रा. येनवा धोटे व सासु सासरे हे नेहमी तुझा आई वडिलांकडुन पैसे आण असे म्हणुन शारीरीक व मानसिक त्रास देत असुन शिवीगाळ करून नेहमी मारपिट करित होते. त्याच्या त्रासाला कंटाळुन फिर्यादीने महिला समुपदेशन केंद्र येथे रिपोर्ट दिली होती परंतु तेथे समझोता न झाल्याने फिर्यादीने पोलीस स्टेशन काटोल येथे येवुन पती व आपले सासु सासरे यांच्या विरूद्ध शारिरिक व मानसिक त्रासाला कंटाळुन पोलीस स्टेशन काटोल येथे येवुन रीपोर्ट दिली.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४९८, ५०४, ५०६, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूढे, पोस्टे काटोल मो. क्र. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर